MHPU180012402016

**<u>नि.दि.दा.क्र. १७३/२०१६.</u>**
**( विशाल वि. स्मिता व इतर )**

## <u>निशाणी २०४ वरील आदेश</u>

(दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी पारित)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे म्हणणे असे की, नि. १०० प्रमाणे दाव्यात कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. प्रतिवादींनी नेहमीच्या पध्दतीप्रमाणे दाव्यात उल्लेख केलेल्या सर्व १० प्रतिवादींची पुर्ण नावे, वय, व्यवसाय व पत्ते लिहिलेले नाहीत कारण सदर दाव्यातील प्रतिवादींच्या नावाचा तपशिल प्रतिवादींना मान्य व कबूल आहे अशी पुरसिस दिली आहे. याप्रमाणे तपशिल असलेला प्रतिदावा मा. उच्च न्यायालयापर्यंत संदर्भात घेतलेला आहे. तथापि, नुकतेच प्रतिवादी क्र. ४ कै. दिपक कुंतीलाल मांडोत यांचे निधन झाले आहे. त्यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यासाठी नि. १९५ अन्वये अर्जही दिलेला आहे. त्यास वादीने हरकत नाही असे लेखी म्हणणेही दिले आहे. तथापि, कैफियतमध्ये व प्रतिवादाव्यामध्ये सर्व प्रतिवादींची नावे व पत्ते नसल्यामुळे दाव्यात उल्लेख केलेला तपशिल बरोबर असल्याने वादीने दुरुस्तीस दिलेल्या अर्जासही या प्रतिवादींची हरकत नसल्याने व तसे लेखी दिल्याने वादींचा प्रतिवादी क्र. ४ याचे वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्याचा अर्जही मान्य झालेला आहे व त्याप्रमाणे वादीने दावा दुरुस्त केलेला आहे. तथापि, नि.

१०० वरील कैफियत व प्रतिदाव्यात प्रतिवादींचा उल्लेख नसल्यामुळे व तो मजकुर तोच असल्याने नि. १०० मध्ये प्रतिवादी क्र. १ ते १० यांचा उल्लेख करण्यास व प्रतिवादी क्र. ४ (नि. १९५) प्रमाणे त्यांच्या वारसांना दाव्याच्या अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे, प्रतिवादी कोणताही नवीन तपशील प्रतिदाव्यात अंतर्भुत करीत नाही. तरी, प्रतिवादींची वरीलप्रमाणे विनंती मान्य करण्यात यावी.

३. प्रस्तुतच्या अर्जास वादीने नि. २०४ प्रमाणे म्हणणे देउन अर्ज मंजूर करण्यास आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार अर्जात नमुद केलेले कारण खरे नाही. सदरचा अर्ज कायद्याने समर्थनिय नाही. नि. १०० हा दिनांक १९.०८.२०१७ रोजीचा असल्याने सदर अर्जास मुदतीच्या काद्याची बाधा येत आहे. सदरचा अर्ज कायद्याने समर्थनिय नाही. सदर अर्ज योग्य व संयुक्तीक कारणाशिवाय असल्यामुळे तो कायद्यानूसार समर्थनिय नाही. सदर अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केलेले नाही. अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा आहे. पुढे त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादींनी नि. ८१ अन्वये तथाकथित कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला आहे. नि. ८४ अन्वये प्रतिवादींनी प्रतिवादींचे प्रतिदाव्यास कैफियत नाही असा अर्ज दिलेला आहे. तसेच, नि. ८५ अन्वये प्रतिदावा हा कैफयतीचा एक भाग असतो अशी पुरसिस दिलेली आहे. सदर वादीने प्रतिवादींच्या नि. ८१ च्या तथाकथित प्रतिदाव्यास दिनांक १७.०७.२०१७ रोजी कैफियत दिलेली आहे व सदरचा तथाकथित प्रतिदाव्यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६.अ नियम ४, ६, ७, ८ मधील कायदेशीर तरतुदीची पुर्तता करत नसल्याने तो प्रतिदावा नाही व तो कायद्याने समर्थनिय नाही. त्याचप्रमाणे नि. ९२ अन्वये दिनांक १७.०७.२०१७ रोजी प्रतिवादींचा तथाकथित प्रतिदावा रद्द करणेबाबतचा वादींनी अर्ज दिला.

४. नि. ९५ अन्वये प्रतिदावा दाखल करणेस परवानगी मिळावी असा अर्ज प्रतिवादींनी दिला. दिनांक २०.०७.२०१७ रोजी नि. ९९ अन्वये दिनांक ०८.०५.२०१७ रोजी दाखल केलेली कैफियत व प्रतिदावा यामधील प्रतिदावा प्रेस करणार नाही अशी प्रतिवादींच्या वकीलांनी पुरसिस दिली. सदरचा अर्ज दिनांक २०.०९.२०१७ रोजी मंजूर झाला आहे. त्यानंतर, नि. १०० अन्वये प्रतिवादींनी तथाकथित प्रतिदावा दाखल केला त्यास वादींनी २५.१०.२०१७ रोजी कैफियत दिलेली आहे.

५. वादींनी नि. १५१ अन्वये जादा मुद्दे काढण्यासाठी अर्ज दिला व सदर अर्जामध्ये प्रतिवादींची नि. ८१ व नि. १०० असे दोन तथाकथित प्रतिदावे आहेत ते दोन्हीही बेकायदेशीर आहेत. तरी, नि. ४१ वरील मुद्दयामध्ये दुरुस्ती करणेसाठी व जादा मुद्दे काढण्यासाठी अर्ज दिला. त्यानंतर, तो अर्ज दिनांक ०२.०२.२०१९ रोजी नामंजूर केला. सदरच्या आदेशा विरुध्द वादींनी रिट पिटीशन नंबर ५५२१/२०१९ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे आव्हानित केला. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सदरचा नि. १५१ चा अर्ज मंजूर केला. त्याप्रमाणे प्रतिवादींच्या नि. ८१ व १०० अन्वये दोन तथाकथित प्रतिदावे आहेत. तसेच, नि. २६ व नि. ८१ अन्वये सदर प्रतिवादींच्या दोन कैफियती दाव्याच्या अभिलेखात आहेत. वर नमुद कारणाचा विचार करता नि. २६ व नि. ८१ तसेच नि. १०० मध्ये प्रतिवादी क्र. ४ कुंतिलाल मांडोत यांच्या नावाचा उल्लेख नसल्याने अगर त्यांच्या सहया नसल्याने प्रस्तुतचा अर्ज मुळत: बेकायदेशीर आहे. केवळ नि. १५१ वरील मुद्दयांचा विचार करता प्रतिवादींनी सदर तथाकथित अर्ज केलेला आहे. प्रतिवादींचा अर्ज मुळत: कायद्यानूसार समर्थनिय नसल्यामुळे तो त्वरीत रद्द होणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे म्हणून अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. प्रस्तुतच्या अर्जावर वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

७. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, दिनांक ०५.१०.२०१९ रोजी प्रतिवादी क्र. ५ वारले आहेत त्यांचे वारस दाव्याच्या अभिलेखास येण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. दिनांक १९.०८.२०१७ ला प्रतिदावा दाखल केलेला आहे तो नि. ८१ वर आहे. त्या दाव्यास वादीने २५.१०.२०१७ रोजी कैफियत दाखल केली आहे. त्यामध्ये कुठेही आक्षेप घेतलेला नाही म्हणून अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

८. वादींचे म्हणणे असे की, नि. १०० प्रमाणे प्रतिवादींनी फक्त प्रतिदावा दाखल केलेला आहे. नि. २६ वर फक्त प्रतिवादी क्र. ५ ची सही आहे. नि. ६६ वर प्रतिदावा दाखल करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. दाव्यामध्ये नि. ८१ वर कैफियत व प्रतिदावा आहे. तसेच नि. १०० वर देखील दुसरा प्रतिदावा आहे. अशा परिस्थितीत, दोन प्रतिदावे कायद्यानूसार समर्थनिय नाहीत. अर्जास शपथपत्र देउन पुष्टी दिलेली नाही. पक्षकारांनी केलेले कथन न्यायालयाच्या परवानगीशिवाय काढून / मागे घेता येणार नाही. प्रतिवादींनी नि. ८१ बाबत पुरसिस (नि.९९) मधे काहीही नमुद केलेले नाही. प्रतिदाव्यात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ४ नियम ६.अ च्या तरतुदीचे कुठलेही पालन केलेले नाही त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

९. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांच्या युक्तीवाच्या अनुषंगाने दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या प्रकरणात प्रतिवादींनी नि. २६ वर कैफियत दाखल केलेली आहे. त्यामध्ये फक्त प्रतिवादी क्र. ५ याची सही आहे. परंतु, नि. ३३ वर प्रतिवादी क्र. १ ते ४, ६ ते १० यांनी पुरसिस देउन प्रतिवादी

क्र. ५ याने दाव्यास दिलेली कैफियत हि त्यांची कैफियत असल्याचे न्यायालयास कळवले आहे त्यामुळे कैफियतवर सही नाही या वादीच्या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही.

१०. प्रतिवादींनी नि. ८१ वर दाव्यास कैफियत व प्रतिदावा दाखल केलेला होता तो नि. ९९ वर पुरसिस देउन त्याबाबत दावा नसल्याचे (not press) न्यायालयास कळवले आहे. वादीच्या म्हणण्यानूसार न्यायालयाच्या परवानगीशिवाय अशाप्रकारे वादकथन काढून घेता येणार नाही. सदर युक्तीवादाच्या अनुषंगाने दाव्याच्या अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादींनी नि. २६ प्रमाणे कैफियत व नि. १०० प्रमाणे प्रतिदावा दाखल केला असल्याचे दिसून येत आहे. नि. ६६ वरील माझे विद्वान पुर्वाधिकारी यांचे आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिवादींना स्वतंत्र प्रतिदावा दाखल करण्याची परवानगी दिली असल्याचे दिसून येत आहे. परंतु, प्रतिवादींनी नि. ८१ प्रमाणे प्रतिदावा व कैफियत एकत्र दिली होती. ती त्यांनी पुरसिस नि. ९९ देउन त्याबाबत दावा नसल्याचे न्यायालयास कळवले आहे. नि. ८१ मधील तसेच प्रतिवादींच्या कैफियत व प्रतिदाव्यातील मजकुर एकच असल्यामुळे त्यांनी न्यायालयाच्या परवानगी विना कोणतेही वाद कथन किंवा कबूली काढून घेतली असल्याचे दिसून येत नाही. फक्त वाद कथन कोणत्या स्वरुपात न्यायालयासमोर मांडायचे याबाबत प्रतिवादी यांनी निवड केलेली आहे. त्यामुळे, प्रतिवादींनी न्यायालयाच्या परवानगी शिवाय वाद कथन काढून घेतले या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही.

११. प्रतिवादींनी नि. २०५ नूसार अर्जास शपथपत्र दिलेले आहे. त्यामुळे, अर्जास शपथपत्रानव्ये पुष्टी दिलेली नाही या मजकूरात तथ्य दिसून येत नाही.

१२. वादीच्या म्हणण्यानूसार नि. ८१ ला व नि. १०० असे दोन प्रतिदावे आहेत. अशा परिस्थितीत, दोन प्रतिदावे कायद्यानूसार समर्थनिय नाहीत. परंतु, नि. ९९ वरील पुरसिसनूसार नि. ८१ वरील कैफियत व वाद कथनाबाबत दावा नसल्याचे (not press) न्यायालयास कळवले आहे. अशा परिस्थितीत, नि. ८१ वरील कैफियत व प्रतिदावा हा दाव्याच्या अभिलेखास असला तरी त्यावर अंमलबजावणी करावयाची नसल्याचे प्रतिवादींनी कळविले असल्याचे तो विचारात घेण्याचे काहीही कारण नाही. अशा परिस्थितीत, प्रस्तुतच्या अर्जा अन्वये अर्जदार नि. १०० वरील प्रतिदाव्या संदर्भात अनुतोष मागत असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे वादीच्या दाव्याच्या अभिलेखास दोन प्रतिदावे आहेत या म्हणण्याच्या पुष्टयर्थ तथ्य दिसून येत नाही.

१३. वादीच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ८ नियम ६.ब मधील तरतुदींचे पालन केलेले नाही. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी प्रतिदावा दाखल करण्यास दिलेल्या मंजूरीचा आदेश मा. उच्च न्यायालय यांनी दिवाणी याचिका क्र. ८२१३/२०१७, विशाल वि. स्मिता व इतर मधील या न्यायनिर्णयात पुष्टी (confirm) दिलेली आहे. सदर प्रतिदाव्याचा सदंर्भ मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशात आलेला आहे. त्यामुळे, त्याच मुद्दयावर पुन्हा कारणमिमांसा करण्याची आवश्यकता नाही.

१४. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ८ नियम ६.अ(४) नूसार प्रतिदाव्यास प्रतिदावा हा दावा म्हणून समजण्यात यावा व त्यास दाव्यासाठी आवश्यक असणारे सर्व नियम लागू असतील असे नमुद केलेले आहे. प्रतिवादींच्या प्रतिदाव्यांचे अवलोकन केले असता त्यामध्ये प्रतिदावा करणा—यांची किंवा प्रतिदाव्यात समाविष्ट

असणा—या प्रतिवादींची नावे प्रतिदाव्याच्या शिर्षकात नमुद केलेली नाहीत. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ६ नियम ३ नूसार वाद कथनाचा नमुना किंवा स्वरुप हे परिशिष्ट अ प्रमाणे असावे असे नमुद केलेले आहे. परिशिष्ट अ मध्ये दाव्याच्या शिर्षकात वादी व प्रतिवादींची नावे नमुद केलेली आहेत. अशा परिस्थितीत, प्रतिवादींनी वाद कथनाच्या नियमांची कसलीही तमा न बाळगता वाद कथन न्यायालयात दाखल केले आहे असे दिसून येत आहे. वास्तविक परिस्थिती अशी असली तरी प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे किंवा प्रतिदाव्याचे योग्य न्यायनिर्णयासाठी आवश्यक आहे हे पहावे लागेल.

१५. प्रस्तावित दुरुस्ती अन्वये प्रतिवादी क्र. ४ यांच्या वारसांची नावे प्रतिदाव्याच्या अभिलेखास आणू इच्छित आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादींच्या बचावास कोणतीही बाधा येणार नाही. वादीने त्याच्या बचावास कशी बाधा येत आहे हे देखील दर्शवून दिलेले नाही. प्रस्तावीत दुरूस्तीमुळे वादीस काहीएक हानी पोहोचणार नाही. प्रस्तुतच्या दुरुस्तीने प्रतिदाव्याच्या मूळ स्वरुपात कुठलाही बदल होणार नाही. तसेच वादीस कुठल्याही आश्चर्यकारक वस्तुस्थितीचा सामना करावा लागणार नाही. प्रस्तावित दुरुस्ती अर्जान्वये प्रतिवादी कुठल्याही प्रकारे नवीन केस मांडत नाहीत. प्रतिदाव्यातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील ख—या वादाच्या मुद्यावर निर्णय घेण्यासाठी प्रस्तावित दुरुस्ती अर्ज मंजूर करणे आवश्यक वाटते. त्याच बरोबर, सदर दुरूस्ती वादी विलंबाने का करत आहेत याचे समाधानकारक स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रतिवादींच्या निष्काळजीपणामुळे त्यांनी केलेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी न्यायालयाचा व पक्षकारांचा विनाकारण वेळ गेलेला आहे. दाव्याचा निर्णय गुणवत्तेवर होणे आवश्यक आहे. त्यामुळे झालेल्या विलंबा बाबत प्रतिवादींवर अर्ज खर्च लादल्यास न्यायोचित होईल. तरी वरील सर्व कारणांचा विचार करुन पुढील आदेश पारीत करीत आहे:—

**नि.दि.दा.क्र. १७३/२०१६**
**निशाणी २०४.**

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांनी वादीस रक्कम रु. २५००/— (रक्कम रुपये दोन हजार पाचशे फक्त) अर्ज खर्च म्हणून द्यावा.

३. अर्जदारांना अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

४. अर्जदारांनी दाव्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती व त्या अनुषंगाने आवश्यक असणारी कार्यवाही या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत किंवा तत्पूर्वी करून घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by Nandkumar Balasaheb Jadhav
Date: 2020.02.17 11:29:31 +0530

दौंड.
दिनांक : १५/०२/२०२०.

(एन. बी. जाधव)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
दौंड, न्यायालय क्र.१.

**नि.दि.दा.क्र. १७३/२०१६**
**निशाणी २०४.**

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Shri. N. B. Jadhav, Civil Judge Junior Division, Daund [Court No.1]. |
| Name of the Steno | : | Miss. F. J. Bijapure, Steno Grade-3. |
| Judgment date | : | 15/02/2020. |
| Judgment signed by P.O. on | : | 15/02/2020. |
| Judgment uploaded on | : | 17/02/2020. |